# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर



संलग्नता विभाग

## परिपत्रक

**वाचा :** १) विद्यापीठाचे जाहिर निवेदन क्र.पुअहोसोविसो/संलग्नता२०२२/जाहिर निवेदन/९४, दिनांक १४/०७/२०२२.
२) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि-४, दिनांक १३/०९/२०१७.

प्रस्तुत विद्यापीठाशी सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य/संचालक यांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, संदर्भ क्र. १ अन्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२३-२४ या पंचवार्षिक सर्वसमावेशक योजनेस अनरूप शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या एका वर्षाची (अल्पकालीन) वार्षिक योजना तयार करणेसंदर्भात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व महाविद्यालयांना नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्र सुरू करणेबाबत दिनांक २०/०७/२०२२ पर्यंत निवेदने सादर करणेबाबत सूचित करण्यात आले होते. त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या निवेदनांवर प्रस्तुत विद्यापीठाने विहित कार्यवाही करून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या एका वर्षाचा बृहत आराखडा तयार करून मंजूरीकरिता शासनास सादर केला. तथापि, आजतागायत शासनाकडून बृहत आराखडयास मंजूरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ मधील तरतूदी व दिनांक १३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार विद्यापीठ स्तरावरील प्रशासकीय कार्यवाही करण्यासाठी बराच कालावधी लागणार असल्याने विद्यापीठाने शासनास मंजूरीसाठी सादर केलेल्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षाच्या बृहत आराखडयास शासन मान्यतेच्या अधिन राहून प्रस्तावित बृहत आराखडयातील स्थळबिंदूनुसार नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासंदर्भातील प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

ज्या महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्र सुरू करावयाचे आहेत, अशा महाविद्यालयांनी सोबत जोडलेल्या बृहत आराखडयातील स्थळबिंदूनसार प्रस्ताव दिनांक १३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १.६ च्या तरतुदीनुसार परिशिष्ट "अ" मधील अर्जाच्या नमुन्यात व त्यासोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये नमूद केलेली कागदपत्रे जोडून व विहित शुल्कासह दिनांक ३०/११/२०२२ पर्यंत पारंपारिक अभ्यासक्रमाचे प्रस्ताव ०३ प्रतीत तर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रस्ताव ०५ प्रतीत सादर करावेत. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ च्या बृहत आराखडयातील स्थळबिंदूव्यतिरिक्त कोणतेही प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पुअहोसोविसो/संलग्नता/प्रस्ताव/२०२२-२३/ 9023
दिनांक : 21 NOV 2022

( योगिनी घारे )
कुलसचिव

**सोबत :-** वरीलप्रमाणे

प्रति,
**मा. प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

## शैक्षणिक वर्ष २०२३-२४ बृहत आराखडा (स्थळ बिंदू)

## New Location for Courses, Division, Faculty, Subject proposed for Year 2023-24

| Taluka<br>तालुका | Place<br>ठिकाण | स्थळ बिंदू मागणी<br>New Course<br>नवीन अभ्यासपाठयक्रम | New Subject<br>नवीन विषय | New Faculty<br>नवीन विद्याशाखा | New Division<br>नवीन अतिरिक्त तुकडी |
|---|---|---|---|---|---|
| Madha | Madha | B.Sc | | Science & Technology | |
| | Tembhurni | B.Sc. (ECS) | | | |
| | Tembhurni | B.C.A. | | | |
| Malshiras | Paniv | B.B.A. | | Commerce & Management | B.C.A. |
| Barshi | Barshi | M.Sc (Organic Chemistry) | | | |
| Barshi | Barshi | B.A. B.Ed | | | |
| | Barshi | B.Sc.B.Ed | | | |
| | Barshi | | | | M.Com |
| | Barshi | | | | B.C.A. |
| Mangalwedha | Mangalwedha | | | | B.A. |
| | Mangalwedha | | | | B.Sc. |
| Karmala | Karmala | B.A. B.Ed | | | |
| | Karmala | B.Sc.B.Ed | | | |

| Taluka तालुका | Place ठिकाण | स्थळ बिंदू मागणी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | New Course नवीन अभ्यासपाठयक्रम | New Subject नवीन विषय | New Faculty नवीन विद्याशाखा | New Division नवीन अतिरिक्त तुकडी |
| Pandharpur | Bhose | B.Sc | | Science & Technology | |
| | Bhose | B.Com | | Commerce & Management | |
| Sangola | Kole | B.Sc (ECS) | | | |
| Akkalkot | Akkalkot | M.B.A. | | | |
| | Akkalkot | M.Sc (Chemistry) | | | |
| | Akkalkot | M. A. (Geography) | | | |
| | Akkalkot | M.A. (Marathi) | | | |
| | Akkalkot | M.Com | | | |
| | Akkalkot | M.C.A. | B.Sc III (Zoology) | | |
| Mohol | Mohol | M.C.A. | | | |
| | Mohol | M.Sc. (Chemistry) | | | |
| University Campus | Solapur | M. A. (Education) | | | |
| | | Acupressure Reflexology & Sport Journalism | | | |
| | | Skill Development Courses related to Environmental Studies & Agro Tourism | | | |